अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.) कार्यालय,
सेवा भरती व परीक्षा नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका.
जा. क्र. :- अतिमआ(ज.)/साप्रवि/सेभक/ 6293
दिनांक :- १८/११/२०२१

## -: परिपत्रक :-

विषय :- वैद्यकीय अधिकारी/निवासी वैद्यकीय अधिकारी, वर्ग-२ या पदाची प्रतीक्षा यादी निरस्त करणेबाबत.

संदर्भ :-
१) जाहिरात क्र. १/३०, दि.२०/०४/२०२०.
२) मा. महानगरपालिका आयुक्त ठराव क्र.१/२७१, दि.०८/०९/२०२०.
३) शासन निर्णय क्र.प्रनिमं १२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ, दि.१३/०७/२०१८.
४) शासन निर्णय क्र. पीएमसी १०१४/प्र.क्र.०२/नवि-२२, दि.२६/०८/२०१४.

पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील वर्ग १ व वर्ग २ संवर्गातील वैद्यकीय तज्ञ / वैद्यकीय अधिकारी पदे कायमस्वरूपी भरणेकरिता संदर्भ क्र. १ अन्वये जाहिरात प्रसिद्ध करणेत आली आहे.

त्यानुषंगाने वैद्यकीय अधिकारी/निवासी वैद्यकीय अधिकारी, वर्ग-२ या पदाकरिता दि.१५/०६/२०२० रोजी मा. कर्मचारी निवड समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये वैद्यकीय अधिकारी/निवासी वैद्यकीय अधिकारी पदाचे निवडयादी व प्रतीक्षा यादी अंतिम करणेत आली. त्यास संदर्भ क्र. २ चे ठरावान्वये मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे.

मा. महापालिका आयुक्त यांचे मान्यतेनुसार निवडयादीतील उमेदवारांची मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणी करून पात्र उमेदवारांचे नियुक्ती आज्ञापत्र प्रसिद्ध करणेत आले आहे. आज्ञापत्र पारित झाल्यानंतर हजर न झालेल्या उमेदवारांच्या ऐवजी प्रतीक्षा यादीवरील उमेदवारांना (संवर्गातील) मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणीसाठी बोलावून प्रतीक्षा यादीवरील पात्र उमेदवारांचे नियुक्ती आदेश पारित केले आहे.

संदर्भ क्र. ३ चे शासन निर्णयातील अट क्र.१३ नुसार, "निवड समितीने तयार केलेली निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यापगत होईल." अशी तरतूद करणेत आली आहे. तसेच संदर्भ क्र. ४ चे शासन निर्णय क्र. पीएमसी १०१४/प्र.क्र.०२/नवि-२२, दि.२६/०८/२०१४ अन्वये मे. शासनाने पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मधील परिशिष्ठ-१ अट क्र.६ नुसार, तयार करणेत आलेली निवडसूची तयार केल्याच्या दिनांकापासून १ वर्षाचे कालावधीपर्यंत वैध असेल." असे नमूद करणेत आले आहे.

वैद्यकीय अधिकारी / निवासी वैद्यकीय अधिकारी, वर्ग-२ या पदाच्या अंतिम निवडयादीस व प्रतीक्षा यादीस मा. महापालिका आयुक्त यांची दि.०८/०९/२०२० रोजी मान्यता प्राप्त असून सदर यादीस दि.०८/०९/२०२१ रोजी १ वर्ष पूर्ण झाले आहे. त्यामुळे उक्त शासन निर्णयानुसार वैद्यकीय अधिकारी / निवासी वैद्यकीय अधिकारी, वर्ग-२ या पदाकरिता निवड झालेल्या व प्रत्यक्ष हजर झालेल्या उमेदवारांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांची निवडयादी / प्रतीक्षा यादी निरस्त करणेत येत आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

Ravi
(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
पुणे महानगरपालिका
17/11/2021

c:\users\admin\desktop\rmo_cancellation.docx